पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- २२/०२/२०२०

## महाशिरात्री निमित्ताने गडचिरोली जिल्ह्यात ठिकठिकाणी झळकले नक्षविरोधी बॅनर

=> क्रूर नक्षलवाद्यांच्या खरा चेहरा जगासमोर मांडणाऱ्या 'मी नक्षलवादी' बॅनर ने वेधले यात्रेकरुंचे लक्ष

गडचिरोली जिल्ह्यात महाशिवरात्री निमित्ताने चामोर्शी तालुक्यातील मौजा मार्कंडा व चपराळा, कुरखेडा तालुक्यातील अरततोंडी, वडसा तालुक्यातील डोंगरमेंढा येथे भव्य यात्रा भरतात. गडचिरोली पोलीस दलाने सदर बाब हेरुन या ठिकाणी नक्षलविरोधात बॅनर लावले आहेत.

नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करावे असे आवाहन गडचिरोली पोलीस दलाने बॅनरव्दारे केले आहे. तर नक्षलवाद्यांच्या क्रूर चेहरा जगासमोर आणण्यासाठी 'मी नक्षलवादी' या आशयाची उपहासात्मक कवितेचे बॅनर यात्रेकरुंचे मोठ्या प्रमाणात लक्ष वेधुन घेत आहेत. या कवितेत नक्षलवादी स्वतःच्या फायद्यासाठी कशाप्रकारे आदिवासी बांधवावर अन्याय, अत्याचार करत आहेत याचे वास्तव मांडण्यात आले आहे.

त्याचबरोबर जिल्ह्यातील विविध पोस्टे, उपपोस्टे, पोमके हद्दीतील हरवलेले इसम, अनोळखी मृतदेह यांचा शोध घेण्यासाठी मोहीम हाती घेऊन त्यांचे फोटो व इत्यंभूत माहिती सोबत देवुन ठिकठिकाणी बॅनर लावण्यात आले आहेत.



नक्षल भगाओ ! आदिवासी बचाओ !!
आदिवासी बांधवांच्या भोळेभाबडेपणाचा
फायदा घेऊन स्वतःची तुंबडी भरतो...
मी नक्षलवादी !!
जल, जंगल, जमिनीचे खोटे स्वप्न दाखवून,
आदिवासींविरुद्ध अन्याय अत्याचार करतो...
मी नक्षलवादी !!
सरकार आदिवासींसाठी काही करत नाही,
असे खोटे-नाटे पसरवून,
विकासाच्या कामात आडकाठी निर्माण करतो...
मी नक्षलवादी !!
आदिवासींची हत्या करतो... मी नक्षलवादी !!
रस्त्याची कामे होऊ देत नाही
परंतु कंत्राटदाराकडून खंडणी वसूल करतो...
मी नक्षलवादी !!
पीएलजीए च्या नावाखाली रस्त्यावर झाडे
पाडून सामान्यांची वाट अडवतो...
मी नक्षलवादी !!
तेंदूपत्ता कंत्राटदारांकडून खंडणी गोळा करून,
ती देशविघातक कामासाठी वापरतो...
मी नक्षलवादी !!
गरीब आदिवासींच्या मुलांना शिक्षणापासून वंचित करतो,
पण स्वतःची मुले फॉरेनला शिकवतो...
मी नक्षलवादी !!
अल्पवयीन आदिवासी मुला-मुलींचा
देशविघातक कृतीसाठी वापर करून घेतो...
मी नक्षलवादी !!








